

# डाकिन्यां भीमशंकरम्





म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ता ला
दा. क्र. ८०९४
IRBK-0107094

दा. क्र. ७०९४

# ‘ डाकिन्यां भीमशंकरम् ’

## भी मा शं क र - क्षे त्र

येथून भीमरथी नदी ।
भीमाशंकरीं घेऊनि गेला नंदी ।
तेथूनि उमगीं पडली सर्वांआधीं ।
मग शंकरें तेथें स्थान केलें ॥

शंकर नारायण जोशी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 30832
विभाग
आ. दि.
... ग्रंथालय शाखा

किंमत
६२
नये पैसे

वा. क्र. ७०९४
दि.

गोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

IRBK-0107094
IRBK-0107094

Copyright :
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.

■

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : १५

■

आवृत्ति पहिली
१९५९

■

किंमत ६२ नये पैसे

■

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं
ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं
भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

■

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि.करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

■

मुद्रक :

जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण, पुणें २

# ‘ डाकिन्यां भीमशंकरम् ’

मुख्य काशीविश्वेश्वर । सेतुबंध रामेश्वर ।
मलकार्जुन भीमाशंकर । गुण आत्मयाचे ॥ ३ ॥

( दास. द. २० स. ७ )

मूळ नांव

भीमशंकर ही मूळची रुद्रदेवता आहे; व ती वेदप्रतिपाद्य आहे. ह्या देवतेचे रूपगुण भयानक व संहारक असे ऋग्वेदामध्यें वर्णिले आहेत. हीच रुद्रदेवता पुढें विष्णुतुल्य होऊन त्रिमूर्तींत जाऊन बसली; आर्यानार्यांच्या झगड्यानंतर भयनाशक, संरक्षक झाली; शं-कर झाली, – शं नाम सुख करणारी ती शंकर – आणि ह्या दोन्ही गुणांचें निदर्शन ‘ रुद्राणां शंकरश्चास्मि ’ ह्या भगवद्गीतेच्या उक्तींत आलें आहे. शंकराचीं कांहीं नांवें जशीं रूपदर्शक – नीळकंठ, चंद्रशेखर, गंगाधर, त्रिलोचन – आहेत; तशीं कांहीं नांवें निवासस्थानकथक आहेत – कैलासनाथ, गिरीश, इत्यादि – आणि कांहीं आप्तपरिवारसूचक – पशुपति, उमापति, भूतेश, रुद्राधिप; तर कांहीं कार्यकथक – त्रिपुरान्तक, स्मरहर – अशीं आहेत. तसेंच भीमाशंकर हें नांव प्रथम ‘भीम-शंकर’ ह्या प्रकारें रूपदर्शक होतें. पुढें त्याचेंच भीमाशंकर ह्या नांवानें तें कार्यकथक आणि साहचर्यसूचक होऊनहि द्वादशज्योतिर्लिंगांत मूळरूपांतच समाविष्ट झालें. ‘ डाकिन्यां भीमशंकरम् ’ हें तें नांव.

श्री : १३१

Copyright :
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.

■

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : १५

■

आवृत्ति पहिली

१९५९

■

किंमत ६२ नये पैसे

■

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

■

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि.करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

■

मुद्रक :

जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण, पुणें २

# ‘ डाकिन्यां भीमशंकरम् ’

मुख्य काशीविश्वेश्वर । सेतुबंध रामेश्वर ।
मलकार्जुन भीमाशंकर । गुण आत्मयाचे ॥ ३ ॥
( दास. द. २० स. ७ )

मूळ नांव

भीमशंकर ही मूळची रुद्रदेवता आहे; व ती वेदप्रतिपाद्य आहे. ह्या देवतेचे रूपगुण भयानक व संहारक असे ऋग्वेदामध्यें वर्णिले आहेत. हीच रुद्रदेवता पुढें विष्णुतुल्य होऊन त्रिमूर्तींत जाऊन बसली; आर्यानार्यांच्या झगड्यानंतर भयनाशक, संरक्षक झाली; शं-कर झाली, – शं नाम सुख करणारी ती शंकर – आणि ह्या दोन्ही गुणांचें निदर्शन ‘ रुद्राणां शंकरश्चास्मि ’ ह्या भगवद्गीतेच्या उक्तींत आलें आहे. शंकराचीं कांहीं नांवें जशीं रूपदर्शक – नीळकंठ, चंद्रशेखर, गंगाधर, त्रिलोचन – आहेत; तशीं कांहीं नांवें निवासस्थानकथक आहेत – कैलासनाथ, गिरीश, इत्यादि – आणि कांहीं आप्तपरिवारसूचक – पशुपति, उमापति, भूतेश, रुद्राधिप; तर कांहीं कार्यकथक – त्रिपुरान्तक, स्मरहर – अशीं आहेत. तसेंच भीमाशंकर हें नांव प्रथम ‘भीम-शंकर’ ह्या प्रकारें रूपदर्शक होतें. पुढें त्याचेंच भीमाशंकर ह्या नांवानें तें कार्यकथक आणि साहचर्यसूचक होऊनहि द्वादशज्योतिर्लिंगांत मूळरूपांतच समाविष्ट झालें. ‘ डाकिन्यां भीमशंकरम् ’ हें तें नांव.

ह्यांतील ‘डाकिनी’ शब्दाचा उलगडा श्रीशंकराच्याच स्तोत्रात पुढीलप्रमाणें आला आहे :


यं डाकिनी-शाकिनिकासमाजे निषेव्यमाणं पिशिताशनैश्च ।
सदैव भीमादिपदप्रसिद्धं तं शंकरं भक्तहितं नमामि ॥ १० ॥
( बृहत्स्तोत्ररत्नाकर )

## डाकिनीवन व समाज

ऋग्वेदकालीं ह्या मुख्य रुद्रदेवतेचे निरनिराळे उपासक व भक्तगण असून त्यांच्या अघोरी ( अगोचरी ) अशा वेगवेगळ्या उपदेवता होत्या. त्यांतीलच डाकिनी व शाकिनी ( व दारुका ) ह्या देवता. ह्यांचा अघोर कार्य व मांसाशनादि सेवन करणारा समाज होता. त्या समाजाची ओळख त्या देवतांच्या नांवावरून होऊं लागली; आणि तें तें स्थलहि ‘ डाकिनीदेवीचें वन ’ म्हणून लोक ओळखूं लागले. पुढें हा समाज शंकराच्या दंडसामर्थ्यामुळें शंकराचा सेवक बनला; आणि तोहि शंकराप्रमाणें ग्राम, नगर, अरण्य ह्यांचा पालक व रक्षक बनला. गांवोगांवीं जीं भैरवाचीं – बहिरोबाचीं स्थानें आहेत, तसेंच डोंगरा-अरण्यांतील वाटांतून जीं लहान लहान देवस्थानें आहेत तीं ह्याप्रमाणें संरक्षक शंकरगणांचींच आहेत. वर जो शंकराच्या स्तोत्रांतील दहावा श्लोक उद्धृत केला त्यांतील ‘भीमादिपदप्रसिद्धं’ ह्या शब्दामधीलहि भीमादि शब्दविग्रह, भीमा आदि असा नसून भीम आदि असा आहे. भीम-चें भीमा हें कसें झालें तें आपण पुढें पाहूं.

## भीमाशंकर लेणीं

जुन्नरच्या दक्षिणेस मानमोड डोंगर आहे. त्यांत अंबा-अंबिका व भीमाशंकर आणि भूतलिंग हीं बौद्ध-लेणीं आहेत. भीमाशंकर डोंगराचा फाटा दूरवर गेला व त्या अनुषंगानें भीमा-शंकर-लेणें हें नांव मानलेलें दिसतें.



भीमाशंकर लेणीं

## बारा ज्योतिर्लिंगें

**ज्या बारा ज्योतिर्लिंगांत हें 'भीमशंकर' दैवत अंतर्भूत आहे त्यांचीं स्थानें व नांवें अशीं :**

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनं ।
उज्जयिन्यां महाकालं ओंकारे ममलेश्वरम् ॥ १ ॥
हिमालये तु केदारं डाकिन्यां भीमशंकरम् ।
वाराणस्यां च विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ॥ २ ॥
परल्यां वैद्यनाथं च नागेशं दारुकावने ।
सेतुबंधे तु रामेशं घृष्णेशं च शिवालये ॥ ३ ॥

**ह्यांतील सुटीं देवनामें लक्षांत घेतलीं असतां सात ईश्वरनामान्त, तीन नाथनामान्त आणि दोन स्वतंत्र आहेत. रामेश्वर, विश्वेश्वर, केदारेश्वर, अमरेश्वर, घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर, महाकालेश्वर; सोमनाथ, वैद्यनाथ आणि मल्लिकार्जुन व भीमाशंकर. ह्या बारा नांवांत नद्यांच्या उत्पत्तीशीं संबद्ध अशीं भीमाशंकर व त्र्यंबकेश्वर हीं**

दोनच नांवें आहेत. हीं सर्व स्थानें व नांवें एककालिक असतील असें नाहीं. ह्या द्वादशज्योतिर्लिंगांचा नामनिर्देश शतरुद्रसंहिता आणि कोटिरुद्रसंहिता ह्यांमधील अनुक्रमें संहिता ३ व २ अध्याय ४२ व १ मध्यें आला आहे व बृहत्स्तोत्ररत्नाकरांत ह्या नांवांचें स्वतंत्र स्तोत्रच दिलें आहे (पृ. १३२). ह्या तिन्ही ठिकाणीं आलेल्या देवतानांवांत आणि त्यांच्या स्थलनामांत थोडा थोडा फरक आहे. ( केदारं हिमवत्पृष्ठे, वैजनाथं चिताभूमौ। श. रु. संहितेंत देवतानाम प्रथमान्त – सोमनाथं च ऐवजीं सोमनाथश्च। इ. – आहे ). ह्या फरकापेक्षां विशेष लक्ष देण्याजोगा महत्त्वाचा फरक आहे तो ' ओंकारे चामलेश्वरं ' ह्या नांवाविषयीं आहे. अमलेश्वरं, अमरेश्वरं, ममलेश्वरं आणि परमेश्वरं अशा चार प्रकारांनीं ह्यांचा निर्देश येऊन सुद्धां 'ओंकारममलेश्वरं' असेंहि ह्यासंबंधांत म्हटलें जातें.

**श्रीममलेश्वर मंदिर व शिलांकित शिवमहिम्न स्तोत्र**

त्यांतल्या त्यांत ( ओंकारे चामरेश्वरं अथवा ) ओंकारे ममलेश्वरं हाच पाठ अधिक सत्य व योग्य आहे. माळव्यामध्यें इंदूर संस्थानांत ( आतां मध्यप्रदेश ) ॐ आकाराचा ओंकारेश्वर-नामक पर्वत आहे. ह्याच नांवाचें गांवहि तेथें आहे आणि महादेवहि आहे. तिकडील हस्तलिखित जुन्या पोथ्यांतून ' ओंकारे ममलेश्वरं ' असेंच लिहिलेलें आढळतें. ॐ-मधील अर्धचंद्र बिंदु हें ममलेश्वराचें मंदिर आहे. ३ ह्या आकाराचा पर्वत आहे आणि ३ ह्या आंकड्यावरील ~ ह्या वळणाचा येथें नर्मदा-प्रवाह आहे. ममलेश्वर ज्योतिर्लिंग हें नर्मदेच्या दक्षिण तीरावर आहे. ११ व्या शतकांतील परमारवंशीय उदयादित्यानें ह्या ममलेश्वर-मंदिरांत चार संस्कृत स्तोत्र-शिलालेख कोरविलेले आहेत. संवत् ११२० (शक ९८५ इ. स. १०६३) मध्यें शिलांकित असलेलें

प्रख्यात शिवमहिम्नस्तोत्रहि त्यांत आहे. मांधाता हाच यौवनाश्व होय. हा क्षत्रिय असून ब्राह्मण झाल्याचें सांगितलें आहे ( वा. २. २९. ११४ ) ह्यानें ह्या ठिकाणीं तप केलें व हा पुढें फार पराक्रमी झाला. ह्याच्या पराक्रमाविषयीं –

> यावत्सूर्य उदेति स्म यावच्च प्रतितिष्ठति ।
> सर्वं तद्यौवनाश्वस्य मांधातुः क्षेत्रमुच्यते ॥ ( वि. पु. )

असें वर्णन आहे. ह्या मांधात्यामुळें ह्या क्षेत्रास ‘ओंकार-मांधाता’ असें नांव रूढ झालें. मूळनांव ओंकार एवढेंच.

येथेंच वर लिहिल्याप्रमाणें शिवमहिम्नस्तोत्र कोरलेलें प्रसिद्ध ममलेश्वर ज्योतिर्लिंग-मंदिर आहे.

ममलेश्वरास देवी अहिल्याबाईपासून चालत आलेलें लिंगार्चन, सदावर्त, पूजा अद्यापहि चालू आहे. पण दुर्दैवानें वस्तुस्थिति सांप्रत अशी झाली आहे कीं, शेंकडा १० टक्केहि यात्रेकरु ह्या ममलेश्वरास जात नाहींत. उत्तर-अंगास जें ओंकारेश्वरस्थान आहे त्याचेंच पंडे मंडळींनीं थोतांड माजविल्यामुळें हा जरा बाजूस असलेला ममलेश्वर बाजूलाच राहिला आहे. वस्तुतः तेंच खरें ज्योतिर्लिंगस्थान आहे. महाशिवरात्रीनिमित्त भागीरथीची कावड भीमरथीबरोबर येण्याची व्यवस्था अहिल्याबाईनीं केली ती ह्या ममलेश्वरालाच अनुलक्षून आहे. म्हणून यात्रेकरूनीं हें आवर्जून लक्षांत बागवून ममलेश्वराचें दर्शन घ्यावें व तेथील भिंतीवरील दगडांत कोरलेलें शिवमहिम्नस्तोत्रहि पाहून व थोडेसें वाचून यावें. केवढा हा भक्तिभाव व केवढी ही सरस्वतीची शाश्वत उपासना !

श्रीवैद्यनाथं

वैद्यनाथं-च्या बाबतींतहि थोडेसें असेंच आहे. उत्तरेकडे त्या बाजूस ‘ झारखंडयां वैद्यनाथं ’ च असा पाठ द्वादशज्योतिर्लिंगात्मक

स्तोत्रपठणांत म्हणतात आणि पूर्व-रेल्वेच्या देवघर शाखेवरील 'वैद्यनाथधाम' स्टेशनजीक असलेल्या झारखंडी वैजनाथासच ज्योतिर्लिंग मानून यात्रा उरकतात. शिवपुराणांत ' वैद्यनाथं चिताभूमौ ' असें आहे. आणि दक्षिणेकडे ' परळ्यां वैजनाथंच ' असेंहि म्हटलें जातें. असो; ह्या द्वादशज्योतिर्लिंगांची किंचित् विस्तारानें चर्चा एवढ्यासाठीं केली कीं, अशी स्पष्टता ह्या दोन नांवांबद्दल अन्यत्र क्वचित् आली असेल. आणि खरें तें कळून येण्यास ह्या निमित्तानें साहाय्य मिळावें.

ज्योतिर्लिंग-देवता

ह्या बाराहि देवतानामांत जी 'ज्योति' संज्ञा आहे तिचा ज्वालामुखीशीं कांहीं संबंध नसून, प्रकाश करते किंवा प्रकाशित करते – ' द्योतते अनेन स ज्योतिः ' एवढ्याच मूलार्थानें ती लक्षांत घ्यावयाची आहे. ह्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं चार पर्वतस्थित आहेत – केदारनाथ, मल्लिकार्जुन, भीमाशंकर व त्र्यंबकेश्वर; दोन समुद्रकांठीं आहेत – रामेश्वर आणि सोमनाथ; आणि बाकीच्या सहांपैकीं तीन नदीतीरीं – महाकाल, विश्वेश्वर, ममलेश्वर असून इतर तीन गांवालगत थोड्या उंचवट्यावर वा सखल प्रदेशांत आहेत – वैजनाथ, नागनाथ आणि घृष्णेश्वर. ह्या स्थानांवरून वर म्हटल्याप्रमाणें हें लक्षांत येईल कीं, हीं स्थानें सर्व एककालिक नाहींत; तसेंच एकहेतुकहि नाहींत. ज्या कारणानें भीमाशंकर स्थानाची उत्पत्ति लक्षांत घ्यावयाची तेंच किंवा तसलेंच कारण रामेश्वर अथवा केदारनाथ ह्यांच्या निर्मितीचें नाहीं. अशीच गोष्ट सोमनाथ आणि त्र्यंबकेश्वर यांची व इतरांचीहि आहे. सारांश प्रत्येकाच्या मागील निर्मितीचा हेतु उदात्त व उद्बोधक; पण ते वेगवेगळाले आहेत. आणि वेगवेगळा आहे म्हणूनच त्यांचा संग्रह केला आहे. तसेंच ह्यांतील प्रत्येक ज्योतिर्लिंगाला उपलिंगेंहि सांगितलीं आहेत. असो;

ह्या बाराहि देवस्थानांचा निर्माण-हेतु पहाणें हें प्रस्तुत आवश्यक नाहीं. भीमाशंकर पुरतें पाहूं.

सामर्थ्यमूर्ति भीमाशंकर व त्रिपुरासुर वध

प्रारंभींच जें समर्थवचन उद्धृत केलें त्याच्याच पुढें त्याचा अर्थ म्हणून ' नाना देवांच्या सामर्थ्यमूर्ति । गुण आत्मयाचे ॥ ' असें सांगितलें आहे. भीमाशंकर ही एक अशीच सामर्थ्यमूर्ति आहे.

आपल्या ह्या महाराष्ट्राचा म्हणजे प्राचीन दक्षिणापथाचा अथवा दंडकारण्याचा भाग पूर्वीं अरण्यमय होता. एकानें ह्या भागांत वस्ती केली. बराचसा प्रांत ताब्यांत ठेवण्याच्या दृष्टीनें त्यानें अंतराअंतरावर प्रथम तीन घरें त्या भागांत बांधलीं. तेथेंच पुढें आणखी वस्ती होऊन हीं तीन घरें असलेलीं तीन स्वतंत्र व जरा प्रशस्त नगरें – पुरें – झालीं. असें त्याचें वैभव व सामर्थ्य वाढल्या-बरोबर तो उद्दामपणानें वागूं लागला; पुढें छलक झाला व त्याचें नांव त्रिपुरासुर त्रिपुर-दैत्य पडलें. पुढें ह्या त्रिपुरासुराच्या त्रासांतून सुटण्याकरितां तेथील जनता इंद्राकडे गेली. हें काम आपल्या हातून निभणारें नाहीं असें पाहून इंद्र त्या लोकांसह शंकराकडे गेला. शंकरांनीं आपल्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें ह्या सर्व लोकांस आश्वासन दिलें आणि त्रिपुरासुराच्या वधासाठीं लगेच ह्या सह्य पर्वतावर शंकर स्वतः आले. येऊन पहातात तों हा त्रिपुरासुर महाबलाढ्य, त्याची चतुरंग सेनाहि मोठी.

मग शंकरांनीं त्याच्यापेक्षांहि आपणांस मोठें झालें पाहिजे असें जाणून स्वतः शंकर भीमरूप धारण करते झाले. (' भीमरूपं दधार ह । ') सैन्यहि फारच मोठें व शिकलेलें सव्यसाची असें सिद्ध केलें आणि त्रिपुरासुराशीं अनेक दिवसपर्यंत एकसारखें युद्ध करून त्या त्रिपुरासुराचा वध केला. तेव्हां सर्व लोकांनीं शंकराची स्तुति केली; इतकेंच नव्हे तर ' हेंच तुझें रूप व गुण आम्हांस

नेहमीं मार्गदर्शन करोत' असें म्हणून शंकराला तेथेंच रहाण्याची प्रार्थना केली व त्याप्रमाणें शंकर तेथें राहिले. तें नांव भीमशंकर. म्हणजे भीमाशंकरचें पहिलें नांव भीमशंकर हें आहे. द्वादश-ज्योतिर्लिंगाच्या संस्कृत स्तोत्रांत 'डाकिन्यां भीमशंकरम्' असेंच असलेलें आपण वर पाहिलें.

'भीम-शंकराचें' भीमा कसें झालें व तेंच लोकांत प्रसिद्ध कां हेंहि मोठें लक्षांत घेण्याजोगें आहे.*

भीम-भीमा शिकवण

आपल्या लक्षांत वरील कथेवरून दोन गोष्टी आल्या. एक म्हणजे संकट दूर करण्यासाठीं संकटापेक्षां आपणांस मोठें झालें पाहिजे तसा शंकर, भीम म्हणजे मोठा झाला; आणि दुसरी म्हणजे नुसतें मोठें होऊनहि भागणार नाहीं तर संकट दूर होईपर्यंत दीर्घ काल आपणांस झगडलें पाहिजे. ह्या दुसऱ्या गोष्टींत भीम-चें भीमा कां झालें हें दिसून येईल.

शंकर त्रिपुरासुरवधासाठीं मोठा होऊन अनेक दिवस एक-सारखा त्याच्याशीं लढत राहिला. तें लढणें हें एक तपच होतें. त्या वेळीं शंकराचा तो भीम म्हणजे मोठा देह घामानें अगदीं डबडबून गेला; घामाच्या नुसत्या धारा चालल्या. ह्या त्याच्या लढाऊ तपास अनुसरून –

कैरवलोचन करुणासमुद्र । रुद्राक्षभूषण रुद्रावतार ।
भीम भयानक भीमाशंकर । तपा पार नाहीं ज्याच्या ॥ १६ ॥

असें श्रीधरानें शिवलीलामृतांत अध्याय एकमध्यें म्हटलें आहे.

---

* स्कंदपुराण – सह्याद्रिखंड, अध्याय १२ – 'भीमशंकर'माहात्म्य आणि पद्म-पुराण उत्तर-संहितेंत ४२ अध्यायांचें 'भीमा'माहात्म्य पठित आहे.

भीमरूप शंकराच्या तपोघर्मधारा तीच भीमा. भीमशंकरापासून उगम पावली ती भीमानदी असें जें आपण म्हणतों त्याची मूळ कथा ही अशी आहे. ही स्कंदपुराणांत आली आहे. पुराणांत रूपक करून सांगण्याच्या प्रथेस अनुसरून अशा कथा मोठ्या उद्बोधक आलेल्या आहेत. शिवपुराण, पद्मपुराण, ह्यांमधून हीच कथा नांवें वेगळीं आणि जरा कथानकाची मांडणी वेगळी, होऊन आली आहे. कुंभकर्णाचा मुलगा भीमासुर, त्याला मारून सुदक्षणराजाचें रक्षण इत्यादि कथाहि तेथें आहेत.

• • •


पण या सर्व कथांतील प्रामुख्यानें भाग एकच व त्याविषयीं स्पष्टपणें – ‘ भीमरूपं दधार ह । रुद्रो रुद्रवपुर्धरः भीम ईश्वरः ॥ ’ हें सांगून ‘ क्लेशेन महता चैव सर्वांगे स्वेद जायत । तदा च घर्मसंयुक्तो भीमो भीमगिरौ शिवः ॥ ’ ही भीमानदीच्या उत्पत्तीमागील कथा किती उद्बोधक आणि प्रेरक आहे !

भीमांगे जायते स्वेदे उदकं चाभिधीयते ।
तद्वारि यत्पुण्यतमं शांतं शांतिकरं परं ॥
भीमां च शंकरं देवं संमतात्पार्युपास्महे ।
भीमाशंकरनाम्ना च देवः सन्निहितः शिवः ॥

भीमाशंकराचें दर्शन, ही कथा लक्षांत न घेतां जर घेतलें तर चर्मचक्षूंनीं एक पाषाणलिंग-मूर्ति पाहिली एवढेंच होईल. आणि ही कथा व त्यांतून मिळणारी शिकवण जर लक्षांत घेऊन मग दर्शन घेतलें तर तें खरें सामर्थ्यदायी ठरेल; व शिकवणुकीनें भक्तहि सामर्थ्यसंपन्न होईल.

## भीमाशंकर स्थान

आतां हें स्थान कोठें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे त्याला जाण्याच्या वाटा कशा हें समजून घेण्यास ठीक पडेल.



भीमाशंकर-मंदिराचा परिसर

पुणें जिल्ह्यांतील आंबेगांव पेटा व खेड तालुका यांच्या सीमेवर हें स्थान आहे. सह्य पर्वताच्या उत्तर-दक्षिण दिशेस पश्चिमेकडे पसरलेल्या मुख्य सह्याद्रीच्या रांगेंत उंच डोंगरावर हें दैवत आहे. ह्या डोंगराचें भीमाशंकराचा डोंगर हेंच नांव लोकप्रसिद्ध आहे. अगदीं जवळचे लोक भवरागिरीचा डोंगर असें म्हणतात. हा डोंगर ३४५४ फूट उंच आहे. इतिहासकालीं कोंकणांतून देशावर येण्याचे जे १४ मार्ग प्रसिद्ध होते त्यांतील एक मार्ग ह्या भीमाशंकर डोंगरांतून आहे. म्हणजे अगदीं नाक्यावर व महत्त्वाच्या जागीं हें स्थान आहे.

डोंगराच्या पायथ्याशीं दक्षिण अंगास भवरागिरी म्हणून एक खेडें; त्या गांवच्या गांवदैवतांपैकीं हें इतिहासकालीन देवस्थान. त्या गांवखर्चांतून ह्याचा थोडा खर्च चाले व त्या गांवचा गुरव ह्याची पूजापाखाळणी करी.

### भीमाशंकर-मार्ग

आतां आपण त्या भीमाशंकराच्या दर्शनाला जाऊं. प्रतिवर्षी महाशिवरात्रीला – माघ वद्य १४ – येथें मोठी यात्रा भरते. कोंकण, देश, मावळ इत्यादि ठिकठिकाणांहून निरनिराळ्या मार्गानें भक्तगण येत असतात. ही वाटचाल पूर्वीं फार लांबणीची आणि दिवस घेणारी असे. आतां मोटारी झाल्यामुळें पहिल्या वाटा कमी प्रमाणांत चालू आहेत आणि हा विद्युच्छकट मार्ग चांगला वहाता झाला आहे.

ह्या देवस्थानास जाण्याचे सध्यां मुख्य मार्ग दोन. पुण्याहून उत्तरेस खेड-मंचर व तेथून पश्चिमेस घोडें, सिनोली, डिंभें पोखरी घाटानें अगदीं थेट देवमंदिराच्या प्रांगणांत मोटारीनें जावयाचें हा एक मार्ग. हा एकंदर ७५ मैलांचा मार्ग आहे. सध्यां स्टेट-ट्रॅन्स० मोटारभाडें ३ रुपये ८० नये पैसे आहे. मुंबईहून येणारी मंडळी तळेगांव स्टेशनवर उतरून खेड-मंचरला येतात व तेथून वरील वाटेनें देवाला जातात. कर्जत किंवा नेरळकडून येणारी यात्रा आग्नेय दिशेनें भीमाशंकरच्या उत्तर अंगानें सांडसच्या बाजूनें करवत घाटानें येते. पण हा मार्ग साधारणतः उन्हाळी आहे. ह्या वाटेनें २०।२२ मैलच भीमाशंकर येतें; पण तो थोडासा त्रासदायक आहे. शिवरात्रीस भक्तगण सर्वच घाटांनीं व वाटांनीं टोळ्याटोळ्यांनीं येतात. मोटारनें जाणें सांप्रत सुखाचें पण जरा खर्चाचें आहे.

### भीमानदी व संतवाङ्मय

भीमा नदीचे प्राचीन व पौराणिक उल्लेख पुष्कळच सांपडतात. संतवाङ्मयांत ह्या भीमाशंकराचा आणि भीमा नदीचा उल्लेख आदरपुरःसर येतो. अनेक संतांनीं ह्या देवस्थानाचें दर्शन घेतल्याचाहि आढळ होतो. ' श्रीज्ञानेश्वरांची आदि ' म्हणून जें

**श्रीसंत नामदेवांनीं ज्ञानदेवांचें तीर्थाटन सांगितलें त्यांत पुढील वचन आलें आहे :**

वंदूनिया गंगाद्वार ब्रह्मगिरी। मग भीमाशंकरीं आनंदला ॥ ११ ॥
देखोनिया भीमा आठवे पंढरी। विठ्ठला अंतरीं पांडुरंगा ॥ १२ ॥

**स्वतः नामदेवांची ‘तीर्थावळी’ म्हणून जो स्वप्रवासवर्णनाचा भाग आहे त्यांत ह्या तीर्थाचा महिमा तेथील कथाभागासह चांगला विस्तृत आला आहे :**

स्कंदासी उपदेशस्थान। लोहोगिरीस येथून।
पुरुरवा पुण्यक्षेत्र महिमान। पूर्वीं येथूनचि जालें ॥ ९ ॥
येथून भीमरथी नदी। भीमाशंकरीं घेऊनि गेला नंदी।
तेथूनि उगमीं पडली सर्वां आधीं। मग शंकरें तेथें स्थान केलें ॥ १० ॥
तें भीमामाहात्म्य प्रसिद्ध। तो हा सिद्धेश्वर अगाध ॥
महायोगेश्वर निजबोध। अलंकापूर पाटणीं ॥ ११ ॥ ( अभंग ७३६ )

**ह्याचप्रमाणें नरहरी मालो ह्यांनींहि मोठा कौतुकपूर्ण उल्लेख आपल्या भूपाळींत केला आहे व तो सर्वजनमुखीं आहे :**

सत्य ज्योतिर्लिंगें बारा। प्रातःकालीं स्मरण करा ॥
कोटि कुळें हीं उद्धरा। भव हा तरा बाप हो ॥ १ ॥ ...
भीमा उगमीं भीमाशंकर। घृष्णेश्वर वेरुळीं ॥ ३ ॥ ( अभंग ३४ )

भीमातटाक

**समर्थ रामदासांनीं आपल्या श्रीमत् दासबोधांत भीमाशंकर दैवताचा उल्लेख केला तो प्रारंभीं दिलाच आहे. त्याशिवाय त्यांच्या डफगाण्यांत व तीर्थावळी दंडीगाणमध्येंहि ‘ मलकार्जुन भीमाशंकर ’ व ‘ पश्चिमेचा भीमाशंकर ’ असा उल्लेख आला आहे. श्रीसमर्थशिष्य गोपाळ म्हणून होता तो भीमाशंकर येथेंच असे. श्रीधरकवींच्या शिवलीलामृतांतील उल्लेखहि वर दिला आहे. श्रीगुरुचरित्रांतील**

उल्लेख भीमाशंकर ह्या दैवतापेक्षां किंवा ह्या स्थानापेक्षां 'भीमानदी'-संबंधानें आहे व तो अगदीं वेगळा आणि लक्षांत घेण्याजोगा आहे. नृसिंहसरस्वतींनीं नद्यांच्या माहात्म्यांचे निर्देश 'तटाकयात्रा' ह्या संज्ञेनें केलेले आहेत. म्हणजे कोणत्या नदीच्या कांठांना किती दूरपर्यंत तो कांठ किंवा तें तीर म्हणावयाचें ? म्हणजे ज्या नदी-प्रवाहाचें माहात्म्य दूर वा समीप सांगितलें आहे त्या मानानें त्या नदीचें माहात्म्य मोठें व लहान मानावयाचें. समजा, एखाद्या नदीला प्रदक्षिणा घालावयाची आहे; प्रत्यक्ष नदीच्या पात्रापासून, अर्थात् रुंदीच्या दृष्टीनें, किती दूरच्या मार्गानें प्रदक्षिणा करावयाची वा रहावयाचें ? भीमानदीच्या उदाहरणानें पहातां भीमानदी-प्रवाहापासून दहा कोसांपर्यंत जरी दुरून प्रदक्षिणा करण्यास यात्रिक चालत राहिला तरी तेथून घातलेली प्रदक्षणा ही भीमाप्रदक्षणाच म्हटली जाईल; हीच गोष्ट वास्तव्याची. ह्याच्या उलट, ज्या नदीची अशी तटाकयात्रा नदीपासून एका कोसांत दूर राहूनच केली असतां चालेल असें सांगितलें असेल, एका कोसापेक्षां अधिक दूर गेला व यात्राचाल केली म्हणजे प्रदक्षणा घातली गेली, तर ती त्या नदीची प्रदक्षणा समजली जाणार नाहीं. कारण त्या नदीचें माहात्म्य एका कोसापेक्षां अधिक दूर नाहीं; ही नदी माहात्म्यदृष्ट्या कमी महत्त्वाची. भीमानदीचें माहात्म्य, पुण्यपावनत्व दहा कोसांइतकेंहि दूरवर मानलें आहे.

हरिहरक्षेत्र महाख्याती । समस्त दोष परिहरती ।
तैसीच असे भीमरथी । दहा गांवें तटाक-यात्रा ॥ ५१ ॥
( गांव म्ह. कोस ) अ. १५

तळेगांव-ढमढेरे येथेंहि एक भीमाशंकर स्थान व मंदिर आहे. पण तें द्वादशज्योतिर्लिंगांतील देवस्थान नाहीं.

पौराणिक कथाभाग व शिकवण आणि स्थानमार्ग लक्षांत घेतल्यानंतर आतां थोडा इतिहासाचा कानोसा घेऊं.

वर सांगितलेंच कीं, भीमाशंकरापासून उत्पन्न झाली ती भीमा व जोडनांव भीमाशंकर हें विख्यात झालें. म्हणजे प्रथम हें संग्रामक्षेत्र आणि नंतर तेंच तीर्थक्षेत्र झालें. द्वादशज्योतिर्लिंगां-मध्यें हें एक प्रमुख ज्योतिर्लिंग म्हणून समाविष्ट झालें व त्याचें हें एक कारण आहे.

भीमानदी – जुने उल्लेख

भीमानदीचा ऐतिहासिक उल्लेख 'भीमरथी' ह्या नांवानें शक ५५६ मधील म्हणजे सुमारें दीड हजार वर्षांपासून सांपडतो. तो पुलकेशी राजा दुसरा ह्यांच्या ऐहोळ शिलालेखांत –

लब्ध्वा कालं भुवमुपगते जेतुमाप्पायिकाख्ये ।
गोविन्दे च द्विरदनिकरैरुत्तरां भैमरथ्याः ॥ १७ ॥

असा आला आहे.

तसेंच सोमेश्वर देवविरचित अभिलषितार्थ चिंतामणि-मानसोल्लास ग्रंथांत ( इ. ११२७–११३८ ) –

पञ्जरा भीमरथ्या च कृष्णवेणी बृहन्नदी ।
मलापहारिणी यत्र सङ्गता लोकविश्रुता ॥ १२४ ॥

असा निर्देश आहे.

शक १३५६ ( कलिवर्ष ४५३५ ) मध्यें गंगाधर पंडित ह्या ज्योतिर्विदानें चांद्रमान ह्या नांवाचें तंत्र केलें आहे. ह्या तंत्रग्रंथांत ग्रंथकारानें स्वतःचें ठिकाण सांगतांना एकीकडे कृष्णवेणी आणि दुसरीकडे भीमरथी ह्यामधील सगर-नगर ही माहिती दिली आहे.

शके १५३१ च्या पत्रांत भीमाशंकराचा उल्लेख शिखराच्या, येथें डोंगराच्या, पायथ्याशीं भवरागिरी म्हणून एक खेडें आहे त्या

खेड्याचें एक दैवत म्हणून आला आहे. ह्या खेड्यावरून भवरगिरीचा डोंगर असें नांव भीमाशंकराचा डोंगर ह्या नांवाऐवजीं त्या खेड्याच्या गांवदप्तरांत आढळतें. खालीं गांवांत श्रीकोटेश्वर, देवहाडा, अशीं आणखी कांहीं गांवदैवतें आहेतच. पण त्या गांवच्या हद्दींत हाहि डोंगर धरला जात असल्यामुळें डोंगरावरील दैवतहि गांवदैवतांत धरलें व त्याची पूजा-अर्चा गांवगुरवाकडून होई. थोडा खर्चहि गांवदप्तरांत पडला आहे हें मागें सांगितलेंच आहे.

वीरांचें आश्रयस्थान

ह्या दैवताचा ह्यानंतरचा उल्लेख मात्र छत्रपति राजारामाच्या राजवटींत आढळतो व एव्हांपासून ही देवता अधिक विख्यात झाली आहे. वर सांगितलें कीं, हें देवस्थान स्वयंभु व भोंवतालीं खूप झाडी असें डोंगरावर आहे. ह्या डोंगरावरील ह्या स्थितीचा फायदा सपाटीवरील आलेल्या आपत्तींच्या वेळीं लोकांनीं घेतला. इ. स. १६९२ मध्यें म्हणजे दिल्लीकर औरंगजेब जेव्हां सर्व महाराष्ट्रभर धुमाकूळ घालून हें 'महाराष्ट्रराज्य' नष्ट करण्यासाठीं अत्यंत कष्ट करीत होता त्या वेळीं, आसऱ्याकरितां कांहीं ह्या बाजूचे लढवय्ये लोक ह्या डोंगरावर जाऊन राहिले व तेथें राहून त्यांनीं मोगल सैन्याशीं झुंजें दिलीं. गुणाजी व राजजी सावंत हे दोघे बंधु – ते पायदळ सैन्याचे पंचसहस्री होते – आपले पदाती लोक घेऊन औरंगजेबाच्या पदरचा एक सरदार अलीबेग याच्याशीं लढण्यासाठीं सचिव शंकराजी नारायणांच्यातर्फे राहिले होते. ह्या सावंत बंधूंनीं येथील जवळचा सिद्धगड तर घेतलाच होता; पण प्रसिद्ध व भव्य जो कोंढाणा ऊर्फ सिंहगड तोहि घेतला. ही सर्व कामगिरी ह्या भीमगिरीवर राहूनच त्यांनीं केली आहे. ( सनदापत्रें पृष्ठ १७१ ).

इतर ऐतिहासिक माहिती :


ह्यानंतर ह्या देवस्थानाचा निर्देश थोरले नाना म्हणजे बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांच्या वेळचा आहे ( इ. १७१४ ). पातशहा औरंगजेब ह्याच्या धुमाकुळीनंतर महाराष्ट्रांत पुनः स्थिर-स्थावर करण्याचें व पुनर्वसाहत करण्याचें काम ह्या पुण्याचे सुभेदार व आतां प्रधान असलेल्या बाळाजी विश्वनाथांनीं केलें. व ह्यांचेच मार्फत चासकर जोशांचेकडे ही कामगिरी आली. कृष्णराव महादेव चासकर ह्यांच्या सरंजामी गांवांत ह्या देवस्थानाकडे इनाम असलेला मौजे खरोसी हा गांव आहे व तो सर्व गांव भीमाशंकर ह्या देवतेकडे चालवावा हें सांगतांना ह्या देवस्थानाचा निर्देश आलेला आहे. येथें हें एक अवश्य सांगण्याजोगें आहे कीं, हा खरोसी गांव ज्या वाडेंतर्फांतील आहे त्या सर्व तर्फांचीच पुनर्वसाहत रामाजी महादेव चासकर जोशी ह्यांनीं केली.

इ. स. १७२४ (श. १६४५) च्या माघांत थोरल्या बाजीरावांची आई राधाबाई ह्या भीमाशंकराच्या दर्शनास गेल्या होत्या. त्यांच्या बरोबर खासबारदार ( हुजूरचे बंदुकवाले ), जासूद इत्यादि परिवार असून खर्च ३९० रुपयेपर्यंत रोजमुरा म्हणून पडला आहे.

कालदृष्ट्या पुढील उल्लेख पेशव्यांचा श्रीवर्धन येथील मुतालीक गोविंद कृष्ण ह्यानें श्रीमंत चिमाजीआप्पांना भीमाशंकर येथील कमलजेच्या तळ्याच्या दुरुस्तीबद्दल लिहितांना आला आहे.

इतर देवस्थानें व तीर्थस्थानें

भीमाशंकर डोंगराच्या माथ्यावर मुख्य श्रीशंकरस्थानाशिवाय इतरहि दैवतें, तीर्थें, कुंडें अरण्यें, राया आहेत. ह्यांपैकीं कांहीं पौराणिक असून कांहीं ऐतिहासिक पत्रांतून निर्दिष्ट आहेत.



भीमेच्या उगमाचें कुंड

**शंकरमंदिराजवळ मोक्षकुंड** ( मोक्षकुंडमथो द्रष्टुं भीमाप्यागच्छदादरात। ४८ अ ५ ) **आणि ज्ञानकुंड** (ज्ञानप्रदं विमोहघ्नं ज्ञानकुंडं मनोहरम्। १ अ. ६ ) **असून पश्चिमेस पापनाशनतीर्थ आहे. भीमकुंडालाच गुप्तभीमेश्वर किंवा गुप्तभीमेशलिंग हीं नांवें आहेत व तें तर तीर्थ प्रसिद्ध व मुख्यच आहे.** ( दक्षिणेस ) **सर्वतीर्थ, साक्षिविनायक,**



कमळजादेवीचें देऊळ

आख्यातीर्थ, व्याघ्रपादतीर्थ इत्यादि तीर्थं आहेत. ह्या सर्वांत ‘कमलजा’ देवीचें स्थान विख्यात आहे. कुशारण्य, क्रीडारण्य ह्याहि स्थानांचा उल्लेख येतो.

भीमाशंकर डोंगरावर म्हणजे ‘ श्रीक्षेत्रीं जनावरें ( श्वापदें ) सांबरें आदि रहातात. त्यास भोवरगांवकरी ( आसपासचे लोक ) तसेंच कल्याण, सिदगड व कोथला नजीक आहेत तेथील लोक, येऊन नाहक पारध करतात ती करूं नये ’; अशी ताकीद नमूद असल्याबद्दल पत्र आहे. अशीच दुसरी ताकीद – ( पे. द. २३. १००, ९९ ) ‘ दक्षिणेकडे क्रीडावन, पूर्वेकडे व्याघ्रारण्य, कुशारण्य, उत्तरेकडे श्रीआईचा हिंदोला-तीर्थ आदि करून आहे तेथें नाना प्रकारचीं पक्षिकुलें संकीर्ण रहातात. त्यास इतर प्रांतस्थ येऊन झाडी तोडतात, तरी धूपराई व वरलि स्थानें ह्यांच्या पलीकडे तोडावी. श्रीच्या क्षेत्रस्थ उपयोगाशिवाय कोणी तोडील त्यास पारिपत्य बरें वजेनें केलें जाईल. ’ ह्याच्याच पुढच्या वर्षीं म्हणजे इ. स. १७६० मध्यें धर्मशाला, कमलजेपलीकडे तळें १०।२० हजाराचें काम करावें अशीहि आज्ञा ( पे. द. ४०.१२९ ) आहे. जवळ हनुमानाचेंहि स्थान आहे.

असे पुष्कळच उतारे देतां येतील; पण त्यांतील दोन महत्त्वाचे संस्मरणीय आहेत. श्रीभीमाशंकराकडे खरोसी हा सर्व गांव इनाम दिला असतां त्याचें उत्पन्न, उत्पन्नाच्या वांटण्या, गांवावरील स्वामित्व, गांवाची शेती जमीन शेजारच्या नायफड, डेहणें, आव्हाट ह्या गांवकऱ्यांनीं आपापल्या गांवशिवारांत दाबली इत्यादि प्रकारें अनेक तक्रारी झाल्या व त्यांचें योग्य निवारणहि तेव्हांच झालें. असेंच एक ह्या गांवाचें भांडण श्रीरामशास्त्री प्रभुणे यांजकडे मनसुबी नेमून सोंपविलें. ‘ त्यांनीं मनास आणितां ( म्हणजे जुने कागदपत्र वगैरे पाहून ) सरकारांत समजाविलें कीं, मौजे मजकूर

शिवाजीमहाराज यांनीं (पूर्वीपासून) मूळ गांव सबंध इनाम (पुढें) दोन हिसे इनाम दिला तो चालविणें. सरकारांत नजर घेतली नाहीं.' ह्याच पत्रांत (पुणें जमाव १३३०) म्हटलें आहे कीं, 'देव बोध्यरूप, वडील ना-तवान, उपाय नाहीं.'

शाश्वत घर

त्या कालीं ईश्वरार्पणपूर्वक देवालयें, विहिरी, तळीं, धर्मशाळा इत्यादि धर्मकृत्यें करण्याबाबत भावना कशा होत्या हें पुढील एका उल्लेखावरून लक्षांत येईल. ह्याच भीमाशंकराचा अगदीं पुढील मंडप बांधणारे नाईक सावकार चिमणाजी अंताजी भिडे यांनीं इ. स. १६३७ मध्यें सदाशिव दीक्षित पटवर्धन सावकार – विश्वासराव पेशव्यांचे श्वशूर – यांस त्यांचाहि तोच नाद पाहून लिहिलें: 'जेणेंकरून इहलोक आणि परलोक उत्तम म्हणत ते कीजे – कोठें देवालयें, कोठें तलें हींच घरें शाश्वत जालीं.'


तीर्थें-देवस्थानें सांगतांना वरील भाग, थोडीशी आडवाट करून, सांगण इष्ट म्हणून सांगितला. डोंगरमाथ्यावर दहा राया असल्याचें ऐतिहासिक कागदांतूनच आलेलें आहे – गावराई, भीमाशंकरराई, पटर्गार (पेटकर महादेव) राई, दलवटराई, दुडेरा, रिठी, महारराई, गारवी इ. त्याचप्रमाणें कुकडपठार, कडेराण, भीमाशंकरदरा ह्याहि स्थलांचा उल्लेख ऐतिहासिक पत्रांतून येतो. (पुणें जमाव द. १४६४ मध्यें) 'महार हडवला श्रीदेव भीमाशंकर याचें वास्तव्य (मौजे मारीं) आहे' असा उल्लेख वारंवार आला असून (यासाठीं असलेल्या जमिनीवर) 'मामूलपासून कर घ्यावयाची चाल नाहीं' (= ह्याहि जमिनीच्या उत्पन्नावर कसलाच अन्य कर, पट्टी नाहीं) असा निर्देश वारंवार म्हणजे प्रतिवर्षींच्या जमाबंदी यादींत आला आहे. देवदर्शनाकरितां निरनिराळ्या वाटेनें ही मंडळी पठारावर

आजहि येतात. दर्शनादि उरकून बाजारहाट करून कांहीं रहातात व कांहीं गांवीं लगेच परत जातात.

सवाई माधवराव पेशवे ह्यांच्या जन्म-प्रसंगीं ( १७७४ ) भीमाशंकरास ताम्याचा ध्वज दिला आहे ( इ. सं. ऐ. त्रि. ). नारो बाबाजी अभ्यंकर ( नगर किल्लेदार ) ह्यांजकडून महारुद्र हयातींत व पश्चात्‌हि चालावा म्हणून आत्मवृत्तांत लिहून व्यवस्था केली आहे ( इ. १७७५ ). मोराजी शिंदे हा रत्नागिरी ता. सुभेदार आपल्या शिक्यांत ‘ भीमाशंकर सखाजी-सुत मोराजी शिंदे, चरणीं तत्पर ’ असा आपल्या दैवताचा उल्लेख आदरपूर्वक करतो.

## पूजा-उत्सवादि धार्मिक कृत्यें

श्रीभीमाशंकर ह्या मुख्य दैवताची नित्य, नैमित्तिक आणि मासिक व वार्षिक अशी पूजा-उत्सवाची व्यवस्था ऐतिहासिक कागदपत्रांतून दिसून येते.



भीमाशंकर-शिवलिंग

नित्यपजेस पंचामृत स्नान-नैवेद्यपूर्वक रुद्रैकादशिनी होत असे आणि त्यासाठीं पंचामृतासाठींच केवळ गाय ठेविलेली असे. नित्य पूजा-साहित्यांत चंदन, गुगुळ, वेलदोडे, साखर, तूप, तेल, फुलें, फळें, विडापानें इत्यादि पदार्थ तर असतच पण २॥ गुंजा केशर गंधासाठीं, कस्तुरी अर्धी गुंज हेहि उंची पदार्थ असत. वर्षाच्या उदवत्त्यांचा खर्च ७३० रु. पडला आहे. एकंदर खर्च ४३८० रु. असल्याचें नमूद आहे.

नैमित्तिक अनुष्ठानेंहि कांहीं आढळतात. छत्रपति शाहू-महाराज जेव्हां आजारी झाले तेव्हां ( इ. स. १७४९ ) ब्राह्मण, आचारी, खटपटे, गडी इत्यादिकांसह आरोग्यार्थ अनुष्ठान ( थेऊर, जेजुरी इ. प्रमाणें ) ह्या भीमाशंकरीं झालेलें आहे. ह्याच वर्षी घृताचा अभिषेक झाल्याची नोंद आहे. मेषसंक्रांतीसहि स्नानादिकांसाठीं छोटी यात्रा येथें भरत असे. सर्वांत महाशिवरात्रीची यात्रा फार मोठी. ह्याच दिवसाकरितां भागीरथीची कावड देवी अहल्याबाईच्या योजनेप्रमाणें येई आणि देवाला भीमा व गंगा ह्या एकत्र जलाचें स्नान मोठ्या महत्त्वाचें मानलें जाई. हा प्रसंग व तीर्थप्रसाद साधण्यासाठीं म्हणजे दर्शनार्थ व जलसिंचन आपल्या अंगावर पडावें ह्यासाठीं फारच गर्दी होई.


‘ जलधारा शिवप्रिया ’ ह्या न्यायानें आजहि ज्ञानकुंडामध्यें व मोक्षकुंडामध्यें स्नान करून श्रीशंकराची रुद्रावर्तनपूर्वक पूजा करणें विशेषतः देवाला पाणी घालणें हें मुख्य मानलें जातें. तसेंच श्राद्धादिक विधिहि येथें केले जातात. कमलजादेवीचें दर्शनहि तितकेंच आवश्यक व महत्त्वाचें गणलें आहे. त्रिपुरासुरयुद्धाचे वेळीं शंकरास या शक्तिदेवीचें साहाय्य झालें व तिची पूजा कमलपुष्पांनीं केली ह्यायोगें तिचें नांव कमलजा असें रूढ झालें ( भीमाशंकरमाहात्म्य अ. ३ ). पूर्वी भीमाशंकर येथें दीपोत्सव होत असे व दिवे लावण्यासाठींहि मजूर रवाना झालेले आहेत. वर ज्या निरनिराळ्या राया दर्शित केल्या त्यांपैकीं कांहीं रायांतील देवींचे नवरात्रांतहि उत्सव झाल्याचें दिसून येतें. इतर जीं देवस्थानें वर सांगितलीं त्यांचेंहि दर्शनपूजन यात्रेकरू यथाशक्ति करतात.

फत्तेसिंग भोसले – अक्कलकोटकर – ह्यांनींहि आपली चौथाई मोकास बाब – खरोसी गांवची – भीमाशंकर देवासाठीं इनाम दिली आहे.

यात्रा-प्रसंगीं दरडोई दोन आणे कर आहे; तो लहान मुलांना मात्र नाहीं.

देवालयादिकांची बांधणी

श्रीभीमाशंकर मंदिराच्या बांधणीविषयीं तीन प्रकार झाले व इतकेंहि करून देवालय अपूर्ण व उघडेंच राहिलें आहे. मूळ मंदिर कसें, केवढें व केव्हां-चें ही माहिती नेमकी मिळाली नाहीं. आज देवा-लयाचे तीन भाग दिसतात: (१) गर्भगृह-गाभारा; (२) कूर्ममंडप, रंगमंडप व (३) सभामंडप. पैकीं सभामंडपाचें काम पूर्ण झाल्याचें व तो मंडप कोणीं बांधला हें सांगणारा पांच ओळींचा शिलालेखच आहे (१) ॥ श्रीशंकर ॥ (२) ॥ स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १६५९ ॥ (३) ॥ पिंगलनामसंवछरे मंडपसिध शे ॥ (४) ॥ वक चिमणाजी आंताजी नाईक भिडे ॥ (५) ॥ सावकार ॥ ह्यावरून इ. स. १७३७ मध्यें हा सभामंडप भिडे सावकार (पुणें जोगेश्वरी आळी) ह्यांनीं बांधला, हें दिसून येतें. त्या मानानें गाभाऱ्यावरील शिखर, कूर्म — व रंगमंडप ह्या कामांच्या बांधणीचे काल पुढले आहेत असें वाटेल; पण असें प्रत्यक्षांत नाहीं. फरक इतकाच कीं, शिखर, गाभारा, कूर्ममंडप ह्या बांधकामासहि तेव्हांच



भीमाशंकराचें देऊळ

३७३२५

प्रारंभ झाला. पण सभामंडप आधीं सिद्ध झाला व मागील बांधकाम नंतरहि होत राहिलें आणि शेवटींहि अपुरेंच राहिलें. पुणें येथील दुसरे सावकार – ह्यांचा उल्लेख वर प्रसंगानें आला आहे – ह्यांची भिडे यांच्याप्रमाणेंच मोठी पेढी होती. तत्संबंधक जमाखर्ची वह्यांतून व त्यांजकडील पत्रव्यवहारांतून इ. स. १७३५ पासून बांधकामासाठीं शेंकडों रुपये खर्चीं पडलेले सांपडतात. देवालय बांधण्याच्या आधींचा खर्च तळेंबांधणीचा मिळतो ( इ. १७३५–३६ ). आणि ह्याच वर्षीं म्हणजे इ. स. १७३६ मध्यें दीक्षित-पटवर्धन यांच्या संग्रहांत एक हजार रुपये भिमाशंकर डोंगरीं मंदिर-इमारतीच्या कार्यासाठीं खर्चीं पडलेले आहेत. ह्याचप्रमाणें पुढें ६७५, ४००, ३०० व ४४,५५२ येथपर्यंत रकमांची नोंद वेळोवेळीं दृष्टीस पडते. देवालयाचें सर्व बांधकाम पुनरुद्धाराचें आहे आणि एकाच वेळीं त्या डोंगरावर विहीर तयार करणें, धर्मशाळा बांधणें हींहि बांधकामें चाललेलीं आहेत. ' कमलजादेवी पलीकडील तळें ' आणि ' हनुमान तळें ' असे दोन तलाव तेथें बांधलेले आहेत. इ. स. १७६० मध्यें धर्मशाळेचें बांधकाम झालें. रघुनाथरावदादा पेशवे ह्यांनीं तेथें विहीर खणविली. पुनरुद्धाराचें बांधकाम नाना फडणीस ह्यांच्या हयातींतील शिखरापुरतें आहे. त्यास ५० हजारांपर्यंत खर्च झाला आहे.

## ऐतिहासिक आख्यायिका

श्रीभीमाशंकर ह्या दैवताचे ऐतिहासिक उल्लेख विश्वसनीय असे शक १५३१ ( इ. स. १६०९ ) पासूनचे सांपडतात. ह्याहि पूर्वींचा ' पूना गॅझटियर 'मधील ( आवृत्ति पहिली इ. स. १८८३ ) निर्देश इ. स. १३५० मधील आहे. पण तो तितका ऐतिहासिक-दृष्ट्या विश्वासार्ह नाहीं. ' भीमाशंकराच्या दरींत कोणी भतीराव म्हणून होता त्यानें झाडें तोडतां तोडतां एकदां एका झाडावर घाव

घातला तों त्यांतून रक्त वाहूं लागलें. अर्थातच भतीराव घाबरला व त्यानें आपली गाय आणून तेथें दुधाची धार धरली मग रक्त थांबलें. दुसरे दिवशीं पहातो तों त्या झाडांतून शंकराची पिंडी बाहेर आलेली त्यास दिसली. उघडच भतीराव त्याचा उपासक बनला. लवकरच त्यानें तेथें लहानसें देवालय उभारलें. ’ ही आख्यायिका स्वयंभु असलेल्या सर्व देवतांच्या बाबतींत ज्या निरनिराळ्या आख्यायिका आढळतात त्यांपैकीं आहे. विशेषतः शंकर देवतेच्या बाबतींत अशा दंतकथा सर्वत्र सांगितल्या जातात. ( नांगरतांना दगडाची कपरी उडून त्यांतून रक्ताची चिळकांडी निघणें, एखाद्या गाईनें आपसुखेंच विवक्षित जागीं नित्य दुग्धधारा सोडणें, स्वप्नांत देव येणें इत्यादि ). अशापैकींच वरील आख्यायिका. ह्या आख्यायिकेपेक्षां पुराणांतरींचे उल्लेख अधिक लक्ष्य होत. भीमाशंकर ह्या नांवासाठीं जी गोष्ट त्यांतून आलेली आहे ती रूपकात्मक असेल; पण ती अधिक मान्य करण्याजोगी व उद्बोधक आहे. भतीरावाच्या वरील गोष्टीनें भतीकेश्वर, वृक्षेश्वर असें कांहीं तरी नांव त्या दैवताचें सांगावयास पाहिजे होतें. मग ‘भीमाशंकर’ हेंच नांव कसें सांगितलें ? सारांश हें दैवत स्वयंभु आहे व भोंवतालीं दाट अरण्य, झाडी होती एवढें येथें लक्षांत घ्यावयाचें आहे.

सांप्रत भीमाशंकर क्षेत्रीं दोन देवळें दिसतात – एक जुनें व दुसरें नवें. एकांत आहे महादेव तर दुसऱ्यांत नुसताच नंदी. या दोन देवळांमधील रिकामी जागा निदान पांच फुटांची तरी आहेच. येथील प्रचंड घंटाहि प्रेक्षणीय आहे. १७२९ इसवी सन कोरलेल्या ह्या घंटेचें वजन पांच मण तरी असावें. तीवर मेरीचें चित्र आहे; म्हणजे ही पोर्तुगीजांकडून आणली गेली.

भीमाशंकराचें मंदिर हेमाडपंती बांधणीचें आहे. त्यावर दशावतारांतील मूर्ति कोरलेल्या आहेत. मूर्ति मोठ्या रेखीव असल्यामुळें मनोहर दिसतात.

कोंकणच्या रस्त्यानें भीमाशंकराला येतांना प्रथम कमळजा-देवीचें देऊळ लागतें. या कमळजा-देवीच्या मंदिरापासून प्रत्यक्ष भीमाशंकराचें स्थान कांहीं अंतरावर आहे. या दरम्यान पसरलेल्या विस्तीर्ण पठारावरच महाशिवरात्रीचा मुख्य बाजार प्रतिवर्षी भरत असतो.

कमळजा मंदिराच्या उत्तरदिशेला एका टेकडीवर भीमेचें उगमस्थान आहे. येथील उगमाचें कुंड चांगलें पुरुषभर उंचीचें असून घडीव काळवत्री दगडांनीं बांधलेलें आहे.

भीमाशंकर गांव म्हणजे दन मिन तीन ब्राह्मणांचीं घरें आणि कांहीं कोळ्यांचीं घरें मिळून बनलेलें खेडें. मात्र याला जंगलखात्याच्या डाक बंगल्याची सोबत आहे. आणि येथें गोरखनाथाचा मठ म्हणूनहि एक मठ दाखविला जातो.

उपसंहार

आर्यांच्या ह्या अखंड भारतांत फार प्राचीन काला-पासून चार धाम, सप्तपुरी, आठ वैष्णव, शैव व शाक्तक्षेत्रें, द्वादश-ज्योतिर्लिंगें, गंगासिंधु इत्यादि पवित्र नद्या, निरनिराळीं तीर्थें आणि दैवतें ह्यांचें दर्शन घेणें, स्नानपान करणें, प्रदक्षणा घालणें, कांहीं काल तरी अशा पवित्र व समाधान देणाऱ्या पुण्य ठिकाणीं वास्तव्य करणें हें, जन्म सार्थकीं लावणारें आणि इहपरलोकीं उत्तम स्थान प्राप्त करून देणारें व्रतच होय असें सांगितलेलें आहे. ह्या व्रताचें परिपालन अखिल हिंदुस्थानांतील सर्व आबालवृद्ध शेंकडों वर्षे आपापल्या शक्त्यनुसार मोठ्या आस्थेनें व दृढ श्रद्धेनें करीत आले आहेत. ह्या व्रताला भारतीयांच्या प्रवृत्तीनुरूप 'यात्रा' असें नांव आहे. एका अर्थी 'आत्मदर्शनयात्रा' असेंहि नांव त्यास देतां येईल. ह्या यात्रेमध्यें द्वादशज्योतिर्लिंगदर्शनयात्रेचें माहात्म्य फारच

मोठें आहे. आणि त्यांतीलच 'भीमाशंकर' ह्या दैवताची माहिती त्याच्या स्थानविशेषासह आपण घेतली.

ही माहिती आपण सामान्यतः वेदकालापासून तों आंग्ल-कालापर्यंतची घेतली. ह्यावरून भारताच्या प्रदीर्घकालीन इतिहासांत वसाहतींचे जे अनेक प्रसंग आले त्याशीं ह्या दैवताचा संबंध असल्याचें साक्षेपी वाचकांच्या ध्यानीं येईल. भारताच्या अष्टदिशांना असलेल्या इतर दूरदूरच्या देवस्थानांना, पवित्र नद्यांना तुम्ही एकवार जा, 'जावयास पाहिजे' असें तरी म्हणत रहा' असें कां सांगितलें गेलें? तर आपण म्हणजे किती व कसे आहों; आपलें स्थान म्हणजे केवढें विस्तीर्ण आहे; आपण किती जुने आहों इत्यादि आत्मदर्शनाचीं, आत्मजागृतीचीं, आत्म-संस्कृतीचीं हीं ठिकाणें आहेत व ह्यासंबंधाचें आपलें कर्तव्य काय आहे हें कळून यावें ह्यासाठीं हे यात्राप्रसंग सांगितलेले आहेत.

यात्राप्रसंगानें ज्या दैवताची वा तीर्थाची आपण यात्रा करणार त्यासंबंधाची माहिती मिळवून किंवा माहिती घेत घेत ती यात्रा केली तर ती डोळस यात्रा होईल. ह्या माहितींत केवळ भाविकपणाचा भाग असल्यानें चालू काळांत भागणार नाहीं तर कोणतीहि माहिती असो ती साधार पाहिजे, तुलनात्मक पाहिजे असा थोडासा प्रयत्न ह्या वरील माहितींत केला आहे. भीमाशंकर ह्या दैवतापुरतीच ही माहिती मुख्यतः द्यावयाची असल्यामुळें भीमा-नदीला अनुलक्षून माहिती थोडी आली. तसेंच मर्यादित स्थळांत ही माहिती द्यावयाची असल्यामुळें श्रुतिस्मृतिपुराणेतिहास दिग्दर्शनार्थ सांगितलेली माहिती 'न्यून तें पुरतें' करून घ्यावी असें विनवून थांबतों.

IRBK-0107094

● ● सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : संच ३ रा :

*महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें*


**गोमंतकाची शान्ति-शक्ति** • १३ •
कवळ्याची शांतादुर्गा : वा. ल. वझे

**पार्वतीपते ! हर हर महादेव** • १४ •
गोमंतकाचा श्रीमंगेश : वा. ल. वझे

**‘ डाकिन्याम् भीमशंकरम् ’** • १५ •
भीमाशंकर क्षेत्र : शं. ना. जोशी

**दलितांचा कैवारी भार्गवराम** • १६ •
कोंकणचें परशुराम क्षेत्र : स. आ. जोगळेकर

**छत्रपतींचें कुलदैवत** • १७ •
शिखर शिंगणापूर : चिं. ग. कर्वे

**श्रीगुरूंचें गंधर्वपूर** • १८ •
श्रीक्षेत्र गाणगापूर : रा. चिं. ढेरे


...अशीं आणखी किती तरी पुस्तकें आम्ही आपल्या हातीं देणार आहोंत. त्यांपैकीं वरील सहांचा हा तिसरा संच.

* * * * * * * * * * * * * * * *

प्रत्येक पुस्तकाची किंमत ६२ नये पैसे
सहा पुस्तकांची संच-पेटी : रुपये ३·७२

* * * * * * * * * * * * * * * *


वोरा ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स, प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २.